सकाळ

# 'रवळनाथ'चा व्यवसाय ७०७ कोटींचा : चौगुले

## सहा महिन्यांत ३५ कोटी ठेवींची वाढ



**एम. एल. चौगुले**

गडहिंग्लज, ता. ४ : चालू आर्थिक वर्षातील सप्टेंबरअखेर श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीच्या ठेवींमध्ये ३५ कोटींनी वाढ झाली. संस्थेचा एकूण व्यवसाय ७०७ कोटींचा झाला असून सहामाही नफा १ कोटी १३ लाख झाला आहे. संस्थेच्या सर्वोत्तम कामगिरीचा वाढता आलेख कायम आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

ते म्हणाले, '३० सप्टेंबरअखेर सभासद संख्या ११ हजार ५१३ इतकी आहे. ४१५ कोटींच्या ठेवी असून, २९२ कोटी ३३ लाखांची कर्जे वितरित केली आहेत. खेळते भांडवल ४६६ कोटी ५८ लाख तर गुंतवणूक १४५ कोटींची आहे. सध्या मोबाईल बँकिंग, सीबीएस, मायक्रो एटीएमद्वारे डिजिटल सेवा दिली जाते. आरटीजीएस, एनईएफटी, लॉकर, वीज बिल भरणासह पेन्शनधारक व ज्येष्ठ नागरिक सोयीसाठी नॅच सेवा दिली जाते. आजारी व वृध्द ग्राहकांना घरपोच सेवा आहे. आयएफएससी कोडसह स्वत:ची वेबसाईटही संस्थेची आहे. संस्थेच्या १५ शाखा कार्यरत असून फ्लॅट खरेदी कर्जाची मर्यादा ९० लाख, तर शैक्षणिक कर्जाची मर्यादा ५० लाखांपर्यंत आहे.' संस्थेच्या प्रगतीसाठी उपाध्यक्ष व्ही. के. मायदेव, संचालक, शाखाध्यक्ष, सल्लागार, सीईओ डी. के. मायदेव, अधिकारी, शाखाधिकारी, सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहकांचे सहकार्य लाभत असल्याचे चौगुले यांनी सांगितले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
05/10/2023 Page No. 4